*गडचिरोली जिल्हा प्रशासनाने पुरग्रस्तांना तातडीने मदतीचा हात देण्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे निर्देश*
*सामाजिक संस्थांच्या माध्यमातुन पुरग्रस्तांना मदतीचे कार्य सुरु*
==========================================================

गडचिरोली जिल्हयात झालेल्या अतिवृष्टीमुळे भामरागड तालुक्यातील 300 गावे संपर्क क्षेत्राबाहेर आहेत. तेथील विज व भ्रमणध्वनी सेवा ठप्प झाली आहे. मोठया प्रमाणावर गावांमध्ये पुराचे पाणी शिरल्याने नागरिकांची गैरसोय झाली आहे. शेकडो घरे क्षतीग्रस्त झाली असून नागरिक पुरामध्ये अडकले आहेत. जिल्हयात सातत्याने पाऊस सुरू असल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. ही भिषण पुरपरिस्थीती लक्षात घेता जिल्हा प्रशासनाने तातडीने पुरग्रस्त नागरिकांना मदतीचा हात द्यावा असे निर्देश गडचिरोली जिल्हयाचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्हाधिका-यांना दिले आहे.

जिल्हयात ब-याच तालुक्यांमध्ये गावांना पुराच्या पाण्याने वेढा घातला असून तेथील नागरिकांची सुटका करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. जिल्हयातील पुरपरिस्थीती हा अतिशय संवेदनशील विषय असल्याने गांभीर्याने परिस्थीती हाताळण्याची आवश्यकता आहे. यात हयगय व हलगर्जीपणा होता कामा नये. पुरपरिस्थीती ओसरल्यानंतर तातडीने घरांच्या, शेतीच्या झालेल्या नुकसानाचे पंचनामे करून नागरिकांना नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्हाधिका-यांना दिले आहे.

*पुरग्रस्तांना मदतीसाठी पालकमंत्र्यांचे सामाजिक संस्थांना आवाहन*
=====================================

गडचिरोली जिल्हयातील पुरग्रस्त गावांमधील पुरग्रस्त नागरिकांना धान्य, कपडे आदी जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करण्यासाठी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी काही सामाजिक संस्थांना केलेल्या आवाहनानुसार संबंधित संस्थांकडून जिल्हयातील पुरग्रस्त गावांमध्ये मदत पुरविण्याचे काम सुरू झाले आहे.